AR1500591

# Savitribai Phule Pune University
## Annual Report Information 2014-2015
### Planning and Development

**College Details**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **1.** | **Name Of the Department/College/Institute** | : Shri Shiv chatrapati College [PUNCODE : CAAP010200] | **2.** | **Address Of the Department/College/Institute** | : Bodke Nagar Ta: Junnar Dist: Pune Pincode: 410502 |
| **3.** | **Name Of the Head/Principal/Director** | : SHELKE BHASKAR TRIMBAK | 4. | **Tele (O/R) With STD Code/Mobile No., Fax No, Email Address and Website Address** | : **Tele.**- 02132-222094 **Email**- ssccj@yahoo.co.in **URL**- sscollegejunnar.com |

**5. Reference Books/Monographs Published by Teacher (2014-2015) :**

| Sr. No. | Name of the Teacher(s)/Author | Title of the Reference Books/Monographs | Name and Place of Publisher(s) | Date of Publication | Isbn/Issn No. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Patil Abhijit Sushikumar | METHODS OF TEACHING ENGLISH POETRY | SOCIAL SCIENCE REPORTER | 2015 | 978-81-930534-8-5 / - |
| 2 | Mane Babasaheb Maruti | Jivan Chaya-Dhup Dhoha Sangrah me Nihit Nari | Harshal Warkhede | 2014 | |
| 3 | Mane Babasaheb Maruti | Dr. Shriram Parihar Ke Nibandhon Me Mulyon Ki Abhivyakti | C.T.Bora College, Shirur , Pune. | 2014 | |
| 4 | Shelke Bhaskar Trimbak | GRAMIN SAHITYA SWAROOP CHIKITSA | Snehawardhan Prakashan Pune | 2015 | 978-93-80821-43-1 / |
| 5 | Thorat Laxman Nana | Granthalaya Mahitishastra | Diaomnd Publications | 2015 | |
| 6 | Shelke Bhaskar Trimbak | VICHARDHARA | SNEHAWARDHAN | 2015 | 978-81-926415-9-1 / |
| 7 | Shelke Bhaskar Trimbak | GRAMIN SAHITYA SWAROOP ANI CHIKISA | SNEHAWARDHAN | 2015 | 978-81-80821-43-1 / |
| 8 | Gawali Santosh Bapurao | Manavi Bhugol (Human Geography) | Diamond Publication, Pune | 2015 | 978-81-8483-614-1 / |
| 9 | Shelke Bhaskar Trimbak | GRAMIN SAHITYA SWAROOP CHIKITSA | Snehawardhan Prakashan Pune | 2015 | 978-93-80821-43-1 / |

**6. No.of Conference, Symposia, Seminars,Workshops etc. Organized (2014-2015)**

| Sr. No. | No. of State Level | No. of National Level | No. of International Level |
|---|---|---|---|
| 1 | NA | NA | NA |

# Savitribai Phule Pune University
## Annual Report Information 2014-2015
### Planning and Development

**7. Research Publications in National and International Journals/Edited Books/Proceedings (2014-2015)**

| Sr. No. | Name of the Teacher's/Author | Title of the Paper | Name of the Journal/Proceeding/Edited Book | Volume & Pages | Year of Publication | ISBN/ISSN No. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Jagdale Uttamrao Gokul | A Geographical Study Of Agro-Tourism In Junnar Tahsil With Special Reference To Parashar Agro-Tourism Centre | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | Vol. 1 & 8 | 2014 | |
| 2 | Jagdale Uttamrao Gokul | A Geographical Analysis Of Ghod Forest Division, Junnar, District -Pune | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | Vol. 1 & 8 | 2014 | |
| 3 | Khilare Sandeep Sitaram | The Self Concept among Tribal Secondary School Students | Samajik Anusandhan | 02 & 39 | 2015 | 2321-9572 / 2321-9572 |
| 4 | Nadhe Vandana Vinayak | Waralai i Warali Chitrakala | Historicity Journal | 01 & 1 | 2015 | 2393-8900 / 2393-8900 |
| 5 | Jagdale Uttamrao Gokul | A Geographical Study of Spatial Variation in Crop Combination of Junnar tahsil, Dist. –Pune (Maharashtra) | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | Vol. 1 & 6 | 2014 | |
| 6 | Jagdale Uttamrao Gokul | Monitoring the Development Plan of Urban Area Using GIS and Remote Sensing Techniques: A Case Study of Junnar City, Pune (MS) | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | Vol. 1 & 10 | 2014 | |
| 7 | Jagdale Uttamrao Gokul | G I.S. Based Land Suitability Assessment Of Baner And Balewadi Village | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | Vol. 1 & 9 | 2014 | |
| 8 | Jagdale Uttamrao Gokul | G I.S. Based Land Suitability Assessment Of Baner And Balewadi Village | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | Vol. 1 & 9 | 2014 | |
| 9 | Pandit Rahul Baliram | Dr. Babasaheb Aambedkar Yanchya Swatantra Majur Pakshacha Jahirnama v Karyakram | Samajik Aanusandhan | V & 4 | 2014 | |
| 10 | Pandit Rahul Baliram | Swatantra Majur Pakshachi Eetihasik Parshvbhumi | Samajik Aanusandhan | IV & 1 | 2014 | |

# Savitribai Phule Pune University
## Annual Report Information 2014-2015
### Planning and Development

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | Pandit Rahul Baliram | Manavi Hakk v Mahilavishyak Drushticone | Samajik Aanusandhan | IV & 40 | 2014 |
| 12 | Gawali Santosh Bapurao | G I.S. Based Land Suitability Assessment Of Baner And Balewadi Village | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | 1 & 9 | 2014 |
| 13 | Gawali Santosh Bapurao | A Geographical Study Of Agro-Tourism In Junnar Tahsil With Special Reference To Parashar Agro-Tourism Centre | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | 1 & 8 | 2014 |
| 14 | Gawali Santosh Bapurao | Monitoring the Development Plan of Urban Area Using GIS and Remote Sensing Techniques: A Case Study of Junnar City, Pune (MS) | International Journal of Advance and Applied Rescarch (IJAAR | 1 & 8 | 2014 |
| 15 | Patil Abhijit Sushikumar | loknete shivaraj patil yencha Latur ghletil Rajkiya netratvach Abhes | Shodh Sampada | 18 & 83 | 2015 |
| 16 | Dushing Ashok Jayavanta | A Geographical Study of Spatial Variation in Crop Combination of Junnar tahsil, Dist. –Pune (Maharashtra) | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | 01 & 6 | 2014 |
| 17 | Kasbe Sachin Nagorao | An International Multidisciplinary Yearly Research Journal | Re-Constuction Mahatama Jyotiba Phule | 1 & 36 | 2014 |
| 18 | Nadhe Vandana Vinayak | 1990 natarchya marathi sahityatil devdasi shriche chitran | Shodhankan | 3 & 3 | 2014 |
| 19 | Dushing Ashok Jayavanta | Monitoring the Development Plan of Urban Area Using GIS and Remote Sensing Techniques: A Case Study of Junnar City, Pune (MS) | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | I & 10 | 2014 |
| 20 | Kasbe Sachin Nagorao | Shivkalin Economy : Approches | Samajik Anusandhan | 4 & 27 | 2014 |
| 21 | Mane Babasaheb Maruti | Kisan Amtahatya Namak Nibandh Sangrah Me Nihit yanga | Research Front | 2 & 6 | 2014 |

# Savitribai Phule Pune University
## Annual Report Information 2014-2015
### Planning and Development

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 22 | Mane Babasaheb Maruti | Hindi Ke Prachar - Prasar Me Sanchar Madhamo ka Yogdan | International Research Journal | 2 & 4 | 2015 | |
| 23 | Kasbe Sachin Nagorao | An International Multidisciplinary Yearly Research Journal | Re-Constuction Chhatrapati Rajashree Shau Maharaj | 1 & 8 | 2014 | |
| 24 | Dushing Ashok Jayavanta | A Geographical Analysis Of Ghod Forest Division, Junnar, District -Pune | International Journal of Advance and Applied Research (IJAAR | 1 & 8 | 2014 | |
| 25 | Vaidya Shriram Avinash | A Key Approach To Maintain Security Through Log Management in Data Sharing In Cloud | IJOER Research Journal | 1 & 5 | 2015 | - / 2395-6992 |
| 26 | Jadhav Mohan Maruti,Langade Sunil Sambhaji | An empirical study of Management of Cooperative banks in Pune district | IRJCMSS | II & 3 | 2015 | NA / 2321-9831 |
| 27 | Lokhande Vinayak Haribhau | Salt stress reveals differential antioxidant and energetic responses in glycophyte (Brassica juncea L.) and halophyte (Sesuvium port1lulacastrum L.) | Frontiers in Environmental Sciences | 3 & 0 | 2015 | --- / -- |
| 28 | Lokhande Vinayak Haribhau | Hairy root induction and phytoremediation of textile dye, Reactive green 19A-HE4BD, in a halophyte, Sesuvium portulacastrum (L.) L. | Biotechnology Reports | 8 & 56 | 2015 | -- / 2215-017X |
| 29 | Jadhav Mohan Maruti | An empirical study of Management of Cooperative banks in Pune district | IRJCMSS | II & 5 | 2015 | NA / 2321-9831 |
| 30 | Joshi Sudhir Krishnaji | Reflection of culture in John Galsworthy,s Strife(1909) and Justice(1910) | Sanshodhan Samiksha | 7 & 57 | 2015 | 2278-9308 / 00 |
| 31 | Mandlik Chandrakant Ramnath | SOCIO CULTURAL IMPLICATIONS IN TEACHING & LEARNING LANGUAGES AND LITERATURE | INTERNATIONAL JOURNAL OF IJBMSS | 3 & 2 | 2014 | - / 22497463 |

# Savitribai Phule Pune University
## Annual Report Information 2014-2015
### Planning and Development

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | Mandlik Chandrakant Ramnath | ROLE OF TEACHER IN QUALITY SUSTENANCE AND ENHANCEMENT OF THE STUDENTS | INFORMATION AND RESEARCH TRENDS | 3 & 4 | 2015 | - / 2320-2327 |
| 33 | Waghmare Mahadeo Bhanudas | The Educational Status and Development of Dalit in princely state of Hyderabad | Colonial Ideology and princely State In India | 01 & 328 | 2014 | 2394-207 X(Print) / 2394-207 X(Print) |
| 34 | Mulla Jainuddin Ramjan | Customers Service in Co-operative Bank- A Case Study of Lala urban Co-operative Bank Ltd. Narayangaon | International Research Journal of Commerce, Management & Research | 2 & 151 | 2015 | 2321-9831 / 2321-9831 |
| 35 | Wajage Eknath Dattatraya | Bhartatil Durshikshnache Mahatva | Samajik Anusandhan | 2 & 4 | 2014 | NA / 2321-9572 |
| 36 | Chaudhari Ravindra Deoram | Detection & Characterisation of Novel Wolbachia strain in Spodoptera litura collected from Western Ghats, India | Journal of Pure & Applied Microbiology | 8 & 3195 | 2014 | -- / 0973-7510 |
| 37 | Jagdale Uttamrao Gokul | A Geographical Anylisys of Ghod Forest Division, Junnar, Dist. - puneA Geographical Study of Migration in Junnar | MMBP, Pune and Arts, Commerce & Science College Akole, Dist. NagarBP and Arts,Commerce and Science College ,Junnar | 200 | 2014 | |
| 38 | Jagdale Uttamrao Gokul | A Geographical Study of crop Diversification of Junnar Tahsil in Pune District. | New Ars Commerce and Science College ,Parner | 150 | 2014 | |
| 39 | Pandit Rahul Baliram | The Historical View of Hindu Fundamentalism | Indian Democracy and Fundamentalism | 50 | 2014 | |
| 40 | Wajage Eknath Dattatraya | Right to Education act 2009 | Right to Education act 2009 | 4 | 2014 | |
| 41 | Sakhare Vinod Vasant | MEASUREMENT OF R.I. OF PURE PETROL AND PETOL WITH KEROSENE, MEASUREMENT OF BLOOD PRESSURE W.R.TO DIFFERENT HEIGHT AND WEIGHT | JCON | 200 | 2015 | (978- ) / NA. |
| 42 | Ujagare Divendra Vinayak | Business and E-Commerce | Natioanl Conference on Role of Bricks in International Trade and Rural Development | 197 | 2015 | 978-93-84916-89-3 / 978-93-84916-89- |

# Savitribai Phule Pune University
## Annual Report Information 2014-2015
### Planning and Development

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 43 | Ujagare Divendra Vinayak | Business and E-Commerce | Natioanl Conference on Role of Bricks in International Trade and Rural Development | 197 | 2015 | 978-93-84916-89-3 / 978-93-84916-89- |
| 44 | Waghmare Mahadeo Bhanudas | The Educational Status and Development of Dalit in princely state of Hyderabad | Colonial Ideology and princely State in India | 328 | 2014 | 2394-207 X(Print) / 2394-207 X(Print) |
| 45 | Kasbe Sachin Nagorao | Terrorism and Human Rights | Proceedings | 81 | 2015 | 978-93-81921-46-3 / 978-93-81921-46- |
| 46 | Kabburi Shivanand Vithoba | Regulated Market and its impotance in Agricultrual Market | Proceedings | 125 | 2014 | 2350-0476 / 2350-0476 |
| 47 | Joshi Vilas Shridhar | Role and Significance of Enterprenuership Development in India with spl. reference to Mirco, Small and Medium Enterprises | Proceedings | 80 | 2015 | 978-93-94916-60-2 / 978-93-94916-60- |
| 48 | Bade Anil Kisan | Role of Physical Educations & Sports in overcoming social Health problems. | Proceedings | 92 | 2015 | 978-81-926129-6-6 / 978-81-926129-6- |
| 49 | Wajage Eknath Dattatraya | "Shikshan Hakka Kayda" | Right To Education Act 2009 | 4 | 2014 | 978-93-82202-23-3 / -- |
| 50 | Chaudhari Ravindra Deoram | Screening the potential of immobilized fresh water alga Spirogyra against sugarcane industry effluent | Innovation 2014 | 12 | 2014 | -- / --- |
| 51 | Chaudhari Ravindra Deoram | National Conference on Advances in Life Sciences | Advances in Life Sciences | 52 | 2014 | --- / --- |

**8. Research Projects/Schemes Undertaken by Teachers (2014-2015)**

| Sr. No. | Name of the Investigator(s) | Faculty | Title of the Research Project/Scheme | Name of the Funding Agency | Duration of the Project/Scheme | Amount Sanctioned (Rs.) | Major/Minc |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MANE B M | Arts | DR SHRIRAM PARIHAR KA SAMAJIK AUR SANSKRUTIK PARID | UGC | 10/09/2010-10/09/2012 | 75000 | Minor |
| 2 | Jadhav Mohan Maruti | Commerce | A study of job satisfaction of lecturers working i | UGC | 01/07/2012-01/07/2014 | 630000 | Major |
| 3 | Prof Jadhav Satish Jaywant | Commerce | "A Study of Socio-Economic Problems of Street Vend | Savitribai Phule Pune University | 27/11/2013-30/11/2015 | 80000 | Minor |

# Savitribai Phule Pune University
## Annual Report Information 2014-2015
### Planning and Development

**9. Teachers Attended Conferences, Seminars, Symposia, Workshops etc. (2014-2015)**

| Sr. No. | No. of Teachers Attended State Level | No. of Teachers Attended National Level | No. of Teachers Attended International Level |
|---|---|---|---|
| 1 | 11 | 9 | 2 |

**10. No. of Collaboration with International Institute/Colleges/University Department during the Year (2014-2015)**

| Sr. No. | MoU | Exchange Program | Exchange of Teachers | Franchise |
|---|---|---|---|---|
| 1 | NA | NA | NA | NA |

**11. Grants Sanction for Funding Agency (2014-2015)**

| Sr. No. | UGC | DST/DBT/B.Voc. | CE/CPE | S.P. Pune University | Any Other |
|---|---|---|---|---|---|
| 1 | NA | NA | NA | NA | NA |

**12. Faculty Wise Enrollment Of Students (2014-2015)**

| Faculty | Sex | Open | Sc | ST | DT(A) | NT | NT(B) | NT(C) | NT(D) | OBC | SBC | Physically Challenged | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | TOTAL | | | | | | | | | | | | |

AR1500591

# Savitribai Phule Pune University
## Annual Report Information 2014-2015
### Planning and Development

**13. Statistical Information about Teacher for Academic Year ( 2014-2015 )**

| Sr.No. | Category | Granted | | | Non Granted | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Male | Female | Total | Male | Female | Total |
| 1 | NT(B) | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| 2 | NT(D) | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| 3 | OBC | 3 | 0 | 3 | 1 | 0 | 1 |
| 4 | OPEN | 12 | 1 | 13 | 0 | 0 | 0 |
| 5 | SC | 8 | 0 | 8 | 0 | 0 | 0 |
| | **Total** | 25 | 1 | 26 | 1 | 0 | 1 |

Date :

Place :

Signature
HOD/Principal/Director

Shri Shiv Chhatrapati College IQAC Junnar (Pune)

**Co-ordinator**
Internal Qua[illegible] [illegible]ssurance Cell
Shri Shiv C[illegible] [illegible]ati College
Junnar (Pune)

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळ,

## श्री शिव छत्रपती कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जुन्नर, जि.पुणे

# महाविद्यालय वार्षिक अहवाल २०१४-१५



मित्र हो !

हिंदवी स्वराज्य संस्थापक, महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री शिव छत्रपतींच्या जन्माने पुनीत झालेल्या आणि लेण्याद्रीच्या गिरिजात्मक, ओझरच्या श्री विघ्नहर यांच्या पुण्यभूमितील श्री शिव छत्रपती महाविद्यालयाचा सन २०१४-१५ चा ४५ वा वार्षिक अहवाल सादर करीत असताना मला अत्यानंद होत आहे.

जुन्नर आणि जुन्नर तालुक्याच्या आदिवासी, डोंगराळ दुर्गम परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी म्हणून जुन्नरचे सुपुत्र आणि मुंबई विद्यापीठाचे तत्कालीन रेक्टर आणि नामवंत शिक्षणतज्ञ **कै.प्रा.गोवर्धन तथा आबासाहेब पारीख** यांच्या नेतृत्वाखाली जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करण्यात आली. तालुक्याचे सुपुत्र व सहकार महर्षी माजी आमदार कै. शिवाजीराव तथा दादासाहेब काळे यांनी त्यांचे सहकारी कै.निवृत्तीशेठ शेरकर, कै.सदु अण्णा परदेशी, कै.ॲड.गणपतराव रोकडे, कै.ॲड.बाबा दिक्षीत, कै.ॲड.शिवाजीराव बुट्टे, ॲड.भाईसाहेब पुरवंत इ.च्या मदतीने महाविद्यालयाच्या विकासाचा रथ पुढे दौडत ठेवला. दानशूर कै.गणपतराव बोडके व त्यांच्या कुटुंबियांनी संस्थेला दान दिलेल्या १० एकर जमिनीवर महाविद्यालय आज डौलाने उभे आहे.

संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे विद्यमान अध्यक्ष ॲड.संजय शिवाजीराव काळे साहेब व इतर विश्वस्तांच्या अथक व सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे व मार्गदर्शनामुळे महाविद्यालयाच्या विकासाची घोडदौड अखंड चालू असून पुणे विद्यापीठ क्षेत्रात एक नामवंत, उपक्रमशील महाविद्यालय म्हणून महाविद्यालयाचा नावलौकिक आहे. त्याचेच फलित म्हणून बंगलोर येथील राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेकडून म्हणजेच 'नॅक' कडून झालेल्या पुनर्मुल्यांकनात महाविद्यालयास 'अ' दर्जा मिळाला आहे. हे सांगताना मला अत्यानंद होत आहे.

या शैक्षणिक अहवाल वर्षात महाविद्यालयातील शैक्षणिक विभाग, अभ्यासपूरक उपक्रम, सामाजिक उपक्रम, कार्यक्रम, प्राध्यापकांची शैक्षणिक व सामाजिक कामगिरी यांचा संक्षिप्त स्वरुपातील आढावा मी आपणापुढे सादर करीत आहे.

### उल्लेखनिय कामगिरी

१. स्वच्छ व सुंदर महाविद्यालय संकल्पना राबविली.

२. विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयाकडून लॅब डेव्हलपमेंटसाठी फिस्ट अंतर्गत रुपये १ कोटी अनुदान मंजूर झाले. त्यापैकी रुपये ५७ लाख अनुदानाचा चेक प्राप्त झाला.

३. महाविद्यालयातील शिस्त समिती, महिला ब्रिगेड ने वर्षभर परिश्रम केले त्यांचे विशेष धन्यवाद.

४. वॉटर प्युरीफायरची सुविधा करून दिल्यामुळे स्वच्छ व शुध्द पाण्याची सोय केली.

५. सहकारमहर्षी कै.शिवाजीराव तथा दादासाहेब काळे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम कोणत्याही प्रकारच्या अनुदानाशिवाय संस्थेने स्वखर्चाने पूर्ण केले, त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष आणि मा.विश्वस्त मंडळाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

६. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कॅफेटेरिया (कॅन्टीन) पूर्णत्वाच्या मार्गावर आहे तसेच प्राणीशास्त्र प्रयोगशाळा पूर्ण.

७. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात वृक्षारोपण व ठिबक सिंचनाची सोय केली.

८. कु.निकीता लुंकड - १२वी कॉमर्स या विद्यार्थीनीने मार्च २०१४ मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेत अकौन्ट या विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले.

९. बी.बी.ए., बी.सी.ए., आय.टी. व इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासक्रमाच्या अद्ययावत संगणक प्रयोगशाळा निर्माण केल्या.

१०. संस्थेचे अध्यक्ष मा.ॲड.संजय काळे यांच्या संकल्पनेतून लँडस्केपींग व इमारत कलरींग पूर्ण झाले.

११. पुणे विद्यापीठाच्या विविध अभ्यास मंडळाचे महाविद्यालयातील खालील प्राध्यापक सदस्य आहेत -
१) प्रा.डॉ.बी.टी. शेळके-मराठी; २) प्रा.डॉ.एम.एम. जाधव-व्या.गणित; ३) प्रा.डॉ.व्ही.एस. जोशी-विमाशास्त्र; ४) प्रा.डॉ.डी.व्ही. उजगरे-सहकार; ५) प्रा.डॉ.जे.आर. मुल्ला-व्यापारी कायदे; ६) प्रा.डॉ.जे.बी. मुर्तडक-बी.बी.ए.; ७) प्रा.सी.आर. मंडलीक-इंग्रजी.

१२. प्रा.डॉ. रविंद्र चौधरी यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आदर्श प्राध्यापक पुरस्कार २०१४-१५ जाहिर झाला. तसेच विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली-रक्कम रुपये १८,९५,०००/- व डी.आर.डी.ओ.-इस्त्रो यांच्याकडून रक्कम रुपये २३,६६,०००/- हे दोन मेजर रिसर्च प्रोजेक्ट मंजूर झाले.

१३. बी.सी.यु.डी. पुणे विद्यापीठाकडून खालील प्राध्यापकांना रिसर्च प्रोजेक्ट मंजूर झाले.
१) प्रा.डॉ.बी.टी. शेळके-मराठी; २) प्रा.डॉ.जे.बी. मुर्तडक-कॉमर्स;
३) डॉ.आर.डी. चौधरी-प्राणीशास्त्र; ४) प्रा.आर.बी. पंडीत-राज्यशास्त्र

१४. महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून क्रिडा सुविधांसाठी व विविध विकास कामासाठी रु. १ कोटी व पुणे विद्यापीठाकडून विविध उपक्रमांसाठी रु. १.५० लक्ष व कॅफेटेरियासाठी ५ लक्ष अर्थसहाय्य मंजूर झाले.

१५. महाविद्यालयामध्ये विविध युजीसी मान्यता प्राप्त व्यावसायभिमुख कोर्सेस सुरू आहेत.
1. G.I.S.; 2. Travel & Tourism; 3. Environment Protection; 4. Computerised Financial Accounting; 5. Information Technology; 6. Women's Study Centre; 7. Human Right P.G.Diploma Course; 8. Remedial Coaching for SC/ST/OBC/Minority Students; 9. Entry in Servises for SC/ST/OBC Category Students

१६. महाविद्यालयातील प्रा.डॉ.सी.आर. मंडलीक यांना इंग्रजी विषयात व प्रा.लेफ्ट.डॉ.वी.एम. माने यांना हिंदी विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. तसेच प्रा.एन.एस. चौधरी-नेट परीक्षा उत्तीर्ण झाले. प्रा.कु.एस.एस. जुवेकर-सेट व नेट परीक्षा उत्तीर्ण झाले.

१७. राष्ट्रीय व राज्य पातळीवरील खेळाडूंसाठी मा.अध्यक्ष ॲड. संजय शिवाजीराव काळे यांच्या सूचनेनुसार ब्लेझर देण्यात आले.

## महाविद्यालयातील अभ्यासक्रम

| | | |
|---|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय | - | कला, वाणिज्य, विज्ञान व किमान कौशल्य आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम - इ.११वी व इ. १२वी., तसेच + २ स्तरावरील द्विलक्षी अभ्यासक्रमावर आधारित संगणकशास्त्र माहिती तंत्रज्ञान व इलेक्ट्रॉनिक्स. |
| पदवी महाविद्यालय | - | बी.ए., बी.कॉम., बी.एससी.-रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञान, प्राणीशास्त्र आणि गणित, बी.बी.ए., बी.सी.ए. |
| पदव्युत्तर महाविद्यालय | - | एम.ए.-मराठी, इंग्रजी, राज्यशास्त्र, भूगोल व इतिहास, एम.कॉम., एम.एस्सी., रसायनशास्त्र. |
| संशोधन केंद्र | - | कॉमर्स व प्राणीशास्त्र |

## महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या

| विभाग | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालय | ११८३ | ११३३ | २३१६ |
| कनिष्ठ महाविद्यालय | १४८१ | १२९० | २७७१ |
| व्यवसाय शिक्षण | ०१७८ | ००२९ | ०२०७ |
| **एकूण** | **२८४२** | **२४५२** | **५२९४** |

## प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद

| वरिष्ठ महाविद्यालय | कनिष्ठ महाविद्यालय | शिक्षकेतर कर्मचारी | एकूण |
|---|---|---|---|
| ७० | ८१ | ४९ | २०० |

## उत्कृष्ट निकालाची परंपरा

फेब्रुवारी २०१४ मध्ये झालेल्या इ. १२वी परीक्षेचे निकाल खालीलप्रमाणे लागले आहेत-

१. १२वी आर्ट्स - ८७.५३%　　२. १२वी कॉमर्स - ९२.३१%

३. १२वी सायन्स - ९०.२७%　　४. १२वी एमसीव्हीसी - ९१.००%

## वरिष्ठ महाविद्यालयाचे एप्रिल/मे २०१४ निकाल खालीलप्रमाणे -

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एफ.वाय.बी.ए. | ८७.०३% | एफ.वाय.बी.कॉम. | ८०.३५% | एफ.वाय.बी.एस्सी. | ८४.७६% |
| एफ.वाय.बी.बी.ए. | ८७.५०% | एफ.वा.बी.सी.ए. | ८९.९९% | एस.वाय.बी.ए. | ९१.००% |
| एस.वाय.बी.कॉम. | ९१.९१% | एस.वाय.बी.एस्सी. | १००.००% | एस.वाय.बी.सी.ए. | १००.००% |
| एस.वाय.बी.बी.ए. | १००.००% | टी.वाय.बी.ए. | ६१.७०% | टी.वाय.बी.कॉम. | ५०.६०% |
| टी.वाय.बी.एस्सी. | ३६.३६% | टी.वाय.बी.बी.ए. | १००.००% | टी.वाय.बी.सी.ए. | ४८.४८% |
| एम.एस्सी.भूगोल | १००.००% | एम.एस्सी.रसायनशास्त्र | ६२.४९% | एम.ए.इंग्रजी | ४४.००% |
| एम.ए.मराठी | ५०.००% | एम.ए. इतिहास | ७५.००% | एम.ए. राज्यशास्त्र | ४०.००% |

चालू शैक्षणिक वर्षात कनिष्ठ महाविद्यालयातील पर्यवेक्षक प्रा.एम.एच. सोमवंशी सेवानिवृत्त झाले व प्रयोगशाळा सहायक श्री.डी.एम. सोनटक्के यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. तसेच वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एल.डी. देवरे व कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.बी.डी. बोऱ्हाडे फेब्रुवारी २०१५ अखेर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांना भावपूर्ण निरोप व शुभेच्छा. ज्युनिअर विभागात प्रा.एन.डी. आगवणे यांची पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन ! तसेच नवनियुक्त प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे हार्दिक स्वागत.

## दातृत्व व ऋणनिर्देश

मा.गणपतराव वोडके व कुटुंबियांनी महाविद्यालयास १० एकर जमिन बक्षिसपत्र देवून शैक्षणिक कार्यास मोलाची साथ दिली त्याबद्दल महाविद्यालय त्यांचे सदैव ऋणी राहील. महाविद्यालयातील गरीब विद्यार्थ्यांसाठी खालील व्यक्तींनी मदत केली त्यांचे महाविद्यालयातर्फे आभार !

हुशार व आर्थिकदृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यासाठी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.के.डी. पुगणे यांच्याकडून संस्थेस रुपये १ लक्ष व प्रा.यु.बी. शेलार यांचेकडून रुपये ५१ हजार देणगी प्राप्त झाली. तसेच प्रा.सौ. उर्मिला काटेकर यांच्या प्रयत्नाने गरीब विद्यार्थी मदत निधीसाठी फ्रेन्डस् ऑफ चिल्ड्रेन, पुणे या सेवाभावी संस्थेकडून शै.वर्ष २०१४-१५ या वर्षात सदर संस्थेने एकूण १५ विद्यार्थ्यांना रुपये ९२०००/- ची मदत केलेली आहे.

तसेच यान कारणासाठी खालील संस्था व व्यक्तींकडून गरजू व गरीब विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे मदत प्राप्त झालेली आहे.

| | |
|---|---|
| १) जैन सोशल ग्रुप इंटरनॅशनल फेडरेशन, पिंपरी, पुणे रुपये ५०००/- | |
| २) डॉ. रौनलक अनिल शेवाळे ............ रु.५०००/- | ३) श्री. रुपेश दुबे ............ रु.१०००/- |
| ४) श्री. राहुलशेठ शेटे ............ रु.३०००/- | ५) सौ. आरती ढोबळे ............ रु.१०००/- |
| ६) डॉ. संदिप द्विवेकर ............ रु.५००/- | ७) सौ. अश्विनी परदेशी ............ रु.१०००/- |
| ८) सौ. पल्लवी मिसाळ ............ रु.१०००/- | ९) श्री. दिपक लांडे ............ रु.१०००/- |
| १०) सौ. रेश्मा कोकणे ............ रु.१०००/- | ११) सौ. शमिका सापळे ............ रु.१०००/- |
| १२) श्री. ऋषभ मंडलीक ............ रु.१०००/ | १३) कु. उल्का काटेकर ............ रु.२०००/- |
| एकूण रुपये २३५००/- | |

या व्यतिरिक्त प्रा.एस.जे. लोढा, श्री. परदेशी जयसिंग सदाशिव यांनी गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली. महाविद्यालय सर्वांचे आभारी आहे.

## भावी संकल्प

भावी काळात महाविद्यालयाने खालील संकल्प सोडलेले आहेत. संस्था पदाधिकाऱ्यांच्या कृतीशिलतेमुळे व आपणा सर्वांच्या सदिच्छांमुळे ते नक्कीच पूर्णत्वास जातील याची खात्री वाटते. त्यात-

१. प्रशस्त व सुसज्ज आणि आधुनिक प्रयोगशाळा निर्मिती करणे.
२. एम.बी.ए. वर्ग सुरू करणे.
३. पॅरामेडिकल कोर्सेस सुरु करणे.
४. कृषी डिप्लोमा कोर्स सुरु करणे.
५. सुसज्ज प्रेक्षागृह पुर्ण करणे.
६. स्टाफ क्वॉर्टर, प्राचार्य क्वॉर्टर्सची उभारणी करणे.
७. ४०० मीटर ट्रॅक तयार करणे, अद्ययावत जिमखाना उभारणी करणे.
८. मुलींसाठी बास्केटबॉल कोर्ट तयार करणे.
९. बॅडमिंटन कोर्ट बांधणे, इनडोअर स्टेडियमचे बांधकाम करणे.
१०. इंजिनिअरींग कॉलेज सुरु करणे.
११. स्पोर्ट्स बॉईज हॉस्टेल बांधणे.
१२. टेनिस कोर्ट बांधणे.
१३. फ्लड लाईट्सची व्यवस्था करणे.
१४. ग्रंथालय इमारत विस्तार करणे.

## भावपूर्ण श्रद्धांजली

अहवाल वर्षात निधन झालेल्या महाविद्यालयाचे सभासद, महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच ज्ञात-अज्ञात हितचिंतकांचे निधन झाले त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

मित्र हो १९७० साली स्थापन झालेल्या या महाविद्यालयाचा आता सर्वांगाने विकास होत आहे. पुणे विद्यापीठ आणि नॅक कमिटीने गुणवत्तेची मोहोर आपल्या महाविद्यालयावर उमटवली आहेच. त्यास जास्तात जास्त पात्र होण्यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची व सदिच्छांची आम्हांस गरज आहे ते सदैव मिळत राहो ही अपेक्षा. विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला, पारितोषिक मिळविले त्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन, भावी वाटचालीस सर्वांना हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद !

**प्रभारी प्राचार्य डॉ.भास्कर शेळके**
**श्री शिव छत्रपती महाविद्यालय,जुन्नर जि.पुणे**